DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)

वसुली विभाग : एव्हरेस्ट ॲनेक्स, द्वारका हॉटेलच्या वर, डोंबिवली रेल्वे स्टेशनजवळ, डोंबिवली (प.)- ४२१ २०२
फोन नं. (०२५१) - २४९४८५३, वेबसाईट : dnsbank.in ई-मेल : recovery@dnsb.co.in

बँकेच्या स्थावर मालमत्तांसाठी जाहीर लिलाव नोटीस (नॉन बँकिंग ॲसेटस्)

याद्वारे सूचना देण्यात येते की, ''नॉन बँकिंग ॲसेटस् म्हणून बँकेच्या मालकीच्या आणि कब्जातील खालील वर्णन केलेल्या मिळकती खालील अटी आणि शर्तींवर ''जे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकल्या जाणार आहेत.

अ. क्र.	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत (रु. लाखात)	इ.अ.र. (रु. लाखात)	निरीक्षणाची दिनांक व वेळ	लिलावाची तारीख व वेळ
१.	भडकमकर मार्ग, ग्रांट रोड (पूर्व), मुंबई-४०० ००७ येथे स्थित मुंबईचा नोंदवीकृत जिल्हा व उपजिल्ह्यामधील ताडदेव विभागाचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ११३ व १/१५२ धारक जमिनीवर बांधकामीत 'जरसा सिनेमा बिल्डिंग' अशी ज्ञात बिल्डिंगच्या ५ व्या मजल्यावरील युनिट क्र. ०१, मोजमापित २९१० चौ.फू.	१०१.००	१०१.८०	०१.०२.२०२० स. १०.०० ते सायं. ५.००	१४.०२.२०२० स. १०.००
२.	जीवराज रामजी बोरिचा मार्ग, सीताराम मील कंपाऊंड, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०११ येथील सीटी सर्व्हे क्र. ७८८ धारक जमिनीवर बांधकामीत बिल्डिंग क्र. ए. ''तांटिया जोगानी इंडस्ट्रियल इस्टेट'' बिल्डिंगमधील २ ऱ्या मजल्यावरील मोजमापित ७५९ चौ.फू. युनिट क्र. २०३.	२०६.००	२०.६०	०१.०२.२०२० स. १०.०० ते सायं. ५.००	१४.०२.२०२० स. ११.००
३.	माहिम विभाग प्रभादेवी, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ५१ व २ए/४९ धारक जमिनीच्या प्लॉटवर उभी सदर इमारतीच्या बेसमेंटमध्ये स्थित क्र. बी/६, बी/७ व बी/९ धारक ३ कार पार्किंग स्पेस वीर सावरकर मार्ग (पूर्वी कँडेल रोड असे ज्ञात) मुंबई-४०० ०२५ येथे स्थित ''रहेजा इम्प्रेस'' अशा ज्ञात बिल्डिंगच्या विंग बीच्या २० व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २००३ मोजमापित १२८८.११ चौ. फू.	१२०.००	१२०.००	०१.०२.२०२० स. १०.०० ते सायं. ५.००	१४.०२.२०२० दु. १२.००
४.	ताडदेव रोड, ताडदेव, मुंबई-४०० ००७ चा पश्चिम बाजूला येथे स्थित मलबार हिल आणि कंबाला हिल विभाग, म्युनिसिपल डी वॉर्ड क्र. २७८ चा सी.एस. क्र. ६५४/ए धारक जमिनीवर बांधकामीत 'मातृ मंदीर सीएचएस लिमिटेड'', २४ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०१, क्षेत्र मोजमापित ६२५ चौ.फू.	२२०.००	२२.०८	०१.०२.२०२० स. १०.०० ते सायं. ५.००	१४.०२.२०२० दु. २.००
५.	ताडदेव रोड, ताडदेव, मुंबई-४०० ००७ चा पश्चिम बाजूला येथे स्थित मलबार हिल आणि कंबाला हिल विभाग, म्युनिसिपल डी वॉर्ड क्र. २७८ चा सी.एस. क्र. ६५४/ए धारक जमिनीवर बांधकामीत 'मातृ मंदीर सीएचएस लिमिटेड'', २४ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०४, क्षेत्र मोजमापित ६२५ चौ.फू.	२२५.०८	२२.५८	०१.०२.२०२० स. १०.०० ते सायं. ५.००	१४.०२.२०२० दु. ३.००

लिलावाचे ठिकाण:– डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., परळ शाखा- सुपारीवाला मॅन्शन, पेट्रोल पंप जवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई-४०० ०१२.

अटी आणि शर्ती:–

१. विक्रीच्या अटी आणि शर्ती असलेली बोली प्रपत्र बँकेच्या परळ शाखेत कोणत्याही कामाच्या दिवशी स. १०.०० व सं. ४.०० दरम्यान उपलब्ध असून प्रत्येक बोलीसाठी रु. १०००/– (विना-परतावा) शुल्क प्रदान केल्यावर मिळू शकतील.
२. **मुंबई येथे देय डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड** च्या नावातील काढलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेडयुल्ड बँकेच्या **''पे ऑर्डर''/''डिमांड ड्राफ्ट''** च्या स्वरूपातील येथे वर नमूद केल्याप्रमाणे इ.अ.र. सह मोहोरबंद पाकिटातून रितसर भरलेले बोली प्रपत्र **१३/०२/२०२०** रोजी किंवा त्यापूर्वी **सं. ५.०० वा.** पूर्वी परळ शाखेतील मुख्य अवस्थापकांकडे पोहोचले पाहीजे. इ.अ.र. चे प्रदान एनईएफटी/आरटीजीएस मार्फतही बँकेकडे करता येईल.
३. बोली प्रपत्रासह बोलीदारांनी केवायसी दस्तावेजांच्या निवासस्थानाच्या पुराव्यांच्या म्हणजेच पॅनकार्ड/आधार इ. च्या स्व-साक्षांकित छायाप्रती व एक पासपोर्ट आकाराचे छायाचित्र सादर केले पाहीजे आणि त्यांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी लिलावाच्या वेळी प्रस्तुत केल्या पाहीजेत.
४. बोलींची मोहोरबंद पाकिटे येथे वर सांगितलेल्या लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी उघडली जातील इअर शिवायच्या किंवा राखीव किंमती खालील किंवा विक्रीच्या अटी व शर्तींशी सुसंगत नसलेल्या बोली विचारांत घेतल्या जाणार नाहीत.
५. बोलीदारांनी व्यक्तीश: लिलावांत सहभागी होणे आवशक आहे. तथापि, बोलीदारांनी त्याच्या/तिच्या/त्यांच्या वतीने सहभागी होण्याकरिता कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत केले असल्यास अशा प्राधिकृत व्यक्तीने त्याच्या/तिच्या नावत बोलीदारांनी जारी केलेले प्राधिकृत पत्र/संचालक मंडळाचा ठराव प्रस्तुत करणे आवश्यक आहे.
६. मिळकतींची विक्री **''जसे आहे जेथे आहे''**, **''जसे आहे जे आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने होईल आणि मिळकतींवर थकीत असलेली कोणतीही वैधानिक आणि अन्य देणी खरेदीदारांनी सोसावयीची आहेत
७. बोली लावायला प्रारंभ झालेल्या सर्वोच्च बोली रकमेपासून प्रारंभ होईल. त्यानंतर बोलींत खालीलप्रमाणे सुधारता येईल- अनु. क्र. १ येथे नमूद केलेल्या मिळकतीसाठी किमान रु. १०.०० लाखांनी. अनु. क्र. २ येथे नमूद केलेल्या मिळकतसाठी किमान रु. २.०० लाखांनी, अनु. क्र. ३ येथे नमूद केलेल्या मिळकतीसाठी किमान रु. १२.०० लाखांनी आणि वर अनु. क्र. ४ आणि ५ येथील मिळकतींसाठी प्रत्येकी रु. २.०० लाखांनी.
८. यशस्वी बोलीदारांनी प्रदान केलेली इ.अ.र. ची रक्कम विक्री किमती मध्ये समायोजित केली जाईल आणि उर्वरित बोलीदारांच्या इ.अ.र. व्याजाशिवाय परत केल्या जातील.
९. यशस्वी बोलीदारांना त्याची/तिची/त्यांची बोली स्वीकारल्यावर ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त पुढील कामाच्या दिवसांच्या **सं. ५.८० वा.** पर्यंत **२५%** बोली रक्कम (इ.अ.र. धरून) जमा करावी लागेल आणि उर्वरित **७५%** बोली रक्कम लिलावाच्या तारखेपासून **१५** दिवसांत प्रदान करावी लागेल.
१०. वरील खंड **(९)** मध्ये सांगितल्या प्रमाणे **२५%** बोली रक्कम प्रदान करण्यांत यशस्वी बोलीदारांनी कसूर केली तर त्याने/तीने जमा केलेली इसारा रक्कम जप्त होईल आणि विक्री रद्द झाल्याचे गृहीत धरले जाईल. तसेच, जर यशस्वी बोलीदारांनी लिलावाच्या तारखेपासून **१५** दिवसांत उर्वरित **७५%** बोली रक्कम प्रदान करण्यात कसूर केली तर बँक त्याने/तिने जमा केलेली **२५%** बोली रकम जप्त करेल.
११. यशस्वी बोलीदार बँकेच्या नावांत **टीडीएस** म्हणून विक्री किमतीची **१%** रकम कापून ती निर्धारित मुदतीत आयकर विभागाकडे भरतील. वजावट केले जाणारे ह्या नात्याने बँकेच्या पॅन क्रमांक बोली पूर्ण झाल्यावर यशस्वी बोलीदारांना कळवळा जाईल. वरील प्रकारे टीडीएस चे प्रदान केल्यानंतर, यशस्वी बोलीदार बँकेकडे फॉर्म नं. २६ क्यु बी च्या चलान-कम-स्टेटमेंटची एक प्रत सादर करतील.
१२. वरील खंड **(९)** मध्ये वर्णन केल्या प्रमाणे संपूर्ण बोली रक्कम आणि फॉर्म नं. २६ क्युबी प्राप्त झाल्यानंतर, बँक यशस्वी बोलीदारांच्या नावात विक्री विलेख बनवेल ज्याची नोंदणी संबंधित दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात यशस्वी बोलीदारांच्या खर्चाने केली जाईल.
१३. निर्धारित मुदतीत संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतरच मिळकतीचा कब्जा खरेदीदारांच्या सुपूर्द केला जाईल.
१४. कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव/बोली फेटाळण्याचे किंवा लिलाव पुढे ढकळण्याचे/रद्द करण्याचे आणि त्याचप्रमाणे कोणत्याही पूर्व सूचने शिवाय विक्रीच्या अटी आणि शर्ती बदलण्याचे तिचे अधिकार बँक राखून ठेवत आहे. दुरूस्त्या, स्पष्टीकरणे, शुद्धिपत्र, पूरकपत्र असल्यास ते बँकेची वेबसाईट www.dnsbank.in वर प्रदर्शित केले जाईल आणि स्वत:ला अवगत ठेवण्याकरिता बोलीदारांनी नियमितपणे ह्या वेबसाईटला भेट द्यावी.
१५. पुढील तपशील/चौकशांसठी इच्छुक बोलीदारांनी निम्नस्वाक्षरीकारांनी **दूरध्वनी क्र. (०२५१)-२४९४८५३/मोबाईल क्र. ९८७०९९५६२५/९८७०९९५६५४** वर संपर्क साधावा.

दिनांक: १४.०१.२०२०
ठिकाण: मुंबई

सही/-
मुख्य व्यवस्थापक

* वरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.